# ग्रामदान आंब्यासारखे गोड आहे


# तुम्ही हे खाऽरे !

दैनिक साम्ययोग-

# विनोबा-वार्ता

मासिक वर्गणी १.५० न. पै.

अंक : ९७ ) वर्धा, बुधवार ता. ८ जुलई १९६४ ( मूल्य ५ न.पै.




आणि इतरांनाहि

ह्याची गोडी

चाखायला सांगा

## श्री नारायण तू

**(ब्रम्ह विद्या मंदिरातील भगिनी समोरील प्रवचन)**

काल आपण पाहत होतो नाममाला. तीन नांवे आपण पाहिली. ॐ तत् सत्. ॐ म्हणजे अनुकूल होणें. माझे कांहीच नाहीं सर्व तुमचेच. मी तुम्हाला अनुकूल आहे. तत् म्हणजे अलिप्त, सर्वांना अनुकूल आहे तरी अंतर्यामातून अलिप्त आहे. म्हणूनच तो अनुकू... शकतो. अलिप्त नसता तर एकाला अनुकूल झाला असता एकाला प्रतिकूल झाला असता. पण तो सत्य आहे.

यापुढे दोन नांवे येतात श्री नारायण. श्री हे ईश्वराचे नांव आहे. ते आपण नेहमीच घेत असतो. पत्र लिहायचे असेल तर श्री ने सुरुवात करतो. श्री म्हणजे शोभा. ही जी शोभा आहे ती निसर्गात सर्वत्र आहे. आपल्या जीवनांतहि शोभा आहे. श्री आहे. आतां ही मंडळी इथे बसली आहेत. चांगली व्यवस्थित बसली आहेत. म्हणून येथें श्री आहे. श्री व्यवस्थेनें येते आणि श्री स्वच्छेतेनें येते. व्यवस्थित स्वच्छ बगीचा आहे; तर तो पाहून आनंद होतो. स्वच्छता आणि व्यवस्थितता दोन्ही मिळून बनते शोभा. ते ईश्वराचे लक्षण आहे.

नारायण ईश्वराचे नांव आहे. ते माणसाशी जोडलेले आहे. नरापासून नारायण. नर म्हणजे नेणारा, नेता. मनुष्य सर्व सृष्टीचा नेता आहे. आसपासची सृष्टि सर्व जनावरे मनुष्याच्या हातात आहे. मनुष्य म्हणजे नेणारा. आणखी नारायण म्हणजे नरसंस्कार, ह्याठिकाणीं जवळ जवळ शंभर माणसे आहेत. हा एक समुदाय आहे. त्या समुदायात ईश्वराचे रूप आहे त्याला नारायण म्हणतात. नर समूहात राहणारा देव तो नारायण. तसा प्रत्येकाच्या हृदयांत ईश्वर; पण जेथे समाज एकवटला तेथें नारायण. नारायण म्हणजे समुदायाची देवता. माणसाचा समुदाय हवा. तेथे स्वच्छता आणि व्यवस्थितता हवी. समुदाय आहे पण स्वच्छता नाही, तर तेथें शोभा नाही, आणि एकटा माणूस आहे आणि भरपूर स्वच्छता आहे तेथें नारायण नाही, म्हणून समुदाय आणि स्वच्छता दोन्ही हवे. ह्याकरतां श्री नारायण ही नांवे एकत्र आली आहेत. ॐ तत् सत् श्री नारायण तू.

—o—

## भूदान, ग्रामदान चळवळींत भाग घ्या.

**भारत सरकारची**

**जिल्हा पंचायतींना विनंती**

इंदूर ता. ३ ( प्रे. ट्र. )

भूदान व ग्रामदान चळवळींत सर्व जिल्हा पंचायतींनी सक्रिय भाग घ्यावा, अशी विनंती करणारे पत्रक भारत सरकारने जिल्हा पंचायतींना धाडले आहे.

सामूहिक विकास व सहकार मंत्रालयातर्फे निघालेल्या या पत्रकांत म्हटले आहे की जर पंचायतींनी भूदान ग्रामदानाच्या कार्यांत लक्ष घातले तर अन्नाचा तुटवडा, बेकारी व मागासलेल्या वर्गाचा उद्धार या समस्या मोठ्या प्रमाणांत सुटू शकतील. ( तरुण भारतवरून )

## विनोबाजी, आतां मुंबईंत या

रायपुर संमेलनांत विनोबाजींना मुंबईच्या मुलांनीं निमंत्रण दिलें होते. तेव्हां त्यांनी लिहिले 'आमच्या घरी' या आमची धडपड पहायला. आम्ही धडपडू आणि तुम्ही निरपेक्ष भावाने या. तुमच्या आगमनाची आम्ही डोळे भरून वाट पाहत आहोत. आतां तुम्हांला आंध्रच्या मुख्यमंत्र्यांचे निमंत्रण आले आहे ते ऐकून धस्स होते. कारण आम्ही जे निमंत्रण दिलें ते मुंबईसाठीं दिले होते. ते सोडून देऊन तुम्ही आंध्रच्या दिशेनें वळाल की काय ही भीति वाटते. तिकडे नाशिक, ठाणा, कुलाबा जिल्हेहि तुमची वाट पाहत आहेत. मुंबईंत अनेक गुंतागुंतीच्या समस्या आहेत. त्या सोडविण्यासाठीं तुम्ही या असें आम्ही म्हणत नाहीं. परंतु तुमच्या आगमनानें मुंबईंत वसंतऋतु येईल. विवेकानंद अमेरिकेत गेले असतांना त्यांना विचारण्यांत आले, "तुम्ही अमेरिकेंत का आलांत ?" तेव्हां ते म्हणाले, "भारताची बुद्धि अमेरिकेंत गहाण पडली आहे तिची सोडवणुक करण्यासाठीं." आज आमची खेडी मुंबईंत भरली आहेत. इलेक्शन जिंकायचे असलें कीं पक्षवाले मुंबईचे 'खेडूत' हाताशी धरतात आणि त्यांच्या दबावानें खेड्यातली मते मिळविली जातात. ही स्थिति बदलायची आहे. मुंबईंत आज हजारो ग्रामोन्नति संघ आहेत. आमचे गोविंदराव शिंदे 'रत्नागिरी जिल्हा सर्वोदय मेळा' मुंबईंत भरवीत असतात. तेव्हां मुंबईतून हे काम सबंध भारतांत अधिक लवकर होऊं शकते याची खात्री पटते. तुमच्या दर्शनानें या ग्रामोन्नति संघात प्राण येईल आणि हजारो सर्वोदय-मित्र घराबाहेर पडतील.

विनोबाजी, मुंबई ही कामधेनू आहे. ती कांही कमी पडू देणार नाहीं-अशी माझी खात्री आहे. मुंबईहून क्रान्ति करण्यासाठीं भगिनी पुढे येतील. मुंबईंतील तरुण-तरुणींना आज नीटसा मार्ग दिसत नाहीं. त्यांना तुमच्यांतील ज्ञान, भक्ति, कर्म, त्याग, तपस्या आणि सेवामय जीवनाचे दर्शन होईल आणि आपल्या जीवनाचा मार्ग त्यांना स्पष्ट दिसू लागेल. मुंबईंच्या तरुणांत धडाडी आहे. त्यांना जे पटेल त्यासाठीं ते सबंध जीवनच फेकून द्यायला तयार होतील. तुम्ही मुंबईला आलांत तर त्यांच्या जीवनाचा प्रवाह एकदम बदलेल. त्यांच्या विचारांना एकदम कलाटणी मिळेल. आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन असें त्यांना होईल. म्हणून मी तुम्हांला हात जोडून विनन्ति करतो कीं तुम्ही मुंबईंत या. आम्ही वाट पाहत आहोत.

—मधु राबकर

## श्री. मामासाहेब क्षीरसागर



ज्यांनी विनोबा पदयात्रेच्या व्यवस्थेसाठी सकाळी दोन वाजेपासून रात्री अकरा वाजेपर्यंत सतत तीन महिने परिश्रम केले–

आज ते मुत्राशयाच्या विकाराने आजारी आहेत. कॅथेटरच्या सहाय्याने त्यांना लघवी होत असते. नागपूरला डॉ. वानकर ह्यांनी श्री. मामासाहेबांची अत्यंत चोख व्यवस्था आत्मियतेने केलेली आहे. मामांच्या वेदना कमी झालेल्या असल्या तरी थांबलेल्या नाहीत. बिच्छान्यावर ते उठून बसतात. कोणी भेटीला आले तर थोडेबहुत बोलतात.

विनोबांची महाराष्ट्रात पदयात्रा चालू असतांना आपण आजारी पडलो ह्याची त्यांना अत्यंत खंत वाटत आहे. ते लिहितात 'विनोबा महाराष्ट्रात यावे आणि त्याचवेळी मी आजारी पडावे ह्यासारखी लाजीरवाणी गोष्ट नाही. फिरून माझ्यासाठी विनोबा महारष्ट्रात यायचे नाहीत किंवा ह्या चाललेल्या क्रांति कार्यात भाग घेण्याची मिळालेली अशी सुवर्ण संधि परत मला मिळायची नाही. मला आरोग्यलाभहि होईल; पण माझ्या आयुष्यात मी ही गमावलेली संधि व त्यामुळे झालेली हानि भरून निघणे अशक्य आहे".

मामांचे मन किती तळमळत आहे हे त्यावरुन स्पष्ट होते. त्यांच्यावर कामाचे जे ओझे आम्ही टाकले त्यामुळेच हा प्रसंग ओढवला. कधी जेवण मिळाले; तर कधी नाही, झोप तर कधीच पूर्ण मिळाली नाही. आणि व्यवस्थेची नित्य चिंता. हा त्रिविध ताप त्यांना सहन करावा लागला. आणि हसत खेळत त्यांनी कोणाच्याहि पाठीचा कणा मोडणारा हा ताण सहन केला. आणि ते होते म्हणूनच व्यवस्थेचा भार सफलतेने वहन करता आला. श्री. मामासाहेबांनी आपलें कर्तव्य चोख बजावले आहे. आणि भंडारा, नागपूर व वर्धा जिल्ह्यात विनोबा पदयात्रा सफल करण्यासाठी त्यांनी जे श्रम घेतले, जीव धोक्यात घालून घेतले त्यामुळे आम्ही सर्व त्यांचे अत्यंत ऋणी आहोत. ते विनोबा पदयात्रेच्या ऋणातून तर केव्हाच मुक्त होऊन चुकले आहेत. आपल्या तळमळीमुळे आणि आमच्या प्रेमाखातर ते लवकर आरोग्यलाभ करतील अशी आशा आहे.

**बसंत बोंबटकर**

--००--

प्रकाशी ता. २०– आज रोजी दुपारी एक वाजतां सर्व धर्म समन्वय दिनाबिमित्त शहादे, तळोदे, व नंदुरबार तालुक्यांतील कार्यकर्त्यांची बैठक गांधीधाम प्रकाशी येथे घेण्यांत आली होती. बैठकीचे अध्यक्षस्थान श्री अनगळ वकील, शहादे ह्यांनी विभूषित केलें होते. बैठकींत श्री रामदासभाई, शहादे, श्री विठ्ठलभाई, प्रकाशे व श्री अनगळ वकील ह्यांची उद्बोधक भाषणें झाली. नंतर शांतिमंडळाची स्थापना करण्यांत येऊव कार्यक्रम विसर्जित करण्यांत आला.

**विठ्ठलभाई पटेल**
संचालक, गांधीधाम, प्रकाशी

## "पेरते व्हा! पेरते व्हा!!"

विनोबाजींना कार्यकर्त्यांकडून सूचना आली 'आतां तुम्ही बसा आम्ही धावतो' विनोबाजींनीं जी चालायला सुरवात केली ती एकान्त साधने नंतर ते जेव्हां एकान्त साधनेंत होते तेव्हां त्यांना साने गुरुजींनीं अगदी आर्तस्वराने भ्रमण करण्यासाठीं विनंति केली होती. परंतु ती साधना सोडून ते गेले नाहीत. ते म्हणाले 'माझ्या पायाला भिंगरी आहे.' साने गुरुजी म्हणाले 'तो भिंगरी आज लागो' परवा विनय-पत्रिका गात असता विनोबाजी म्हणाले, साने गुरुजींनीं मला पत्र लिहिले होते–

> हृदयांत सेवा वदनांत सेवा
> उतरे न हातात करूं काय देवा ?

त्यावर मी उत्तर लिहिले –

> हृदयांत सेवा वदनांत सेवा
> उतरे न हातात निश्चिन्त देवा !

विनोबाजींना बसा सांगायचे म्हणजे साने गुरुजी आमच्या आंत नाचायला हवेत. विनोबांच्या भाषणामधील "अजून पंढरपूरचे विठ्ठलमंदिर हरिजनांसाठीं मोकळे झाले नाहीं, तर मग तुम्हांला स्वराज्य मागण्याचा अधिकार काय ?" हे वाक्य साने गुरुजींना कुणीतरी सांगितले आणि त्यांच्यात चैतन्य संचारले. त्यावेळी त्यांनी सबंध महाराष्ट्रांत पायपीट केली. आणि पंढरपूरचा पांडुरंग मोकळा व्हावा म्हणून पंढरपूरला जाऊन पांडुरंगाजवळ धरणे धरले. आमच्या फिरण्यांत ही हिंमत आली तर हजारो हातानें काम करणारा आणि हजारो मस्तके असणाऱ्या प्रभुचे सहाय्य आम्हाला मिळू शकते. आतां विनोबाजी पेरणीसाठीं जाणार नाहींत. कापणीसाठीं जातील. तेव्हां हे काम तरुणांनीं हातांत घ्यावे आणि ग्रामदानाचा विचार पेरीत सुटावे. ते असे काम करूं लागले कीं साने गुरुजी त्यांच्या हृदयांत शिरतील आणि परमेश्वर त्यांना 'चालवील हाती धरुनिया ?'

**मधु रावकर—**

## महाराष्ट्र सर्वोदय मंडळाची व स्वागत समितीची सभा व बैठकी

११ जुलै ला गोपुरी–वर्धा येथे दुपारी दोन वाजता महाराष्ट्र सर्वोदय मंडळ व महाराष्ट्र विनोबा स्वागत समितीच्या कार्यकारिणीच्या सदस्यांची बैठक होईल तसेच संध्याकाळी ६। ते ७ वाजेपर्यंत विनोबांच्या सोबत परंधाम पवनार आश्रमात ह्या सर्वांची चर्चा होईल.

रात्री ८॥ वाजता साम्ययोग साप्ताहिक आणि दैनिकाबाबत, साम्ययोग समितीच्या सदस्यांची बैठक होईल.

महाराष्ट्र शांतिसेना समिति आणि अन्य समित्यांच्या बैठकीपण त्यावेळी होतील. तरी सर्व सदस्यांनी ह्या महत्वाच्या बैठकीला हजर राहण्याची कृपा करावी. ही विनंति.

एकनाथ भगत
मंत्री, महाराष्ट्र सर्वोदय मंडळ.

संपादक :–श्री. गोपाळराव काळे, श्री. वसंतराव बोंबटकर,
प्रकाशक:–श्री. वसंतराव बोंबटकर,
मुद्रक:–गो. भा. जोशी, भास्कर प्रेस, वर्धा.
स्वामित्व:–महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, मुंबई.

साम्ययोग : दैनिक ता. ८-६-६४ अं.९७र.नं.ए.न.२९५
विनोबा वार्ता, मगनवाडी, वर्धा ( म. राज्य )
श्री. ________________